



**शहिदांना अभिवादन...** पोलीस स्मृती दिनानिमित्त २१ ऑक्टोबर रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात शहीद पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मानवंदना देण्यात आली. त्यानंतर पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी हुतात्म्याच्या स्मृतीस्थळास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस नेहमीच तत्परतेने कार्यरत असतात. या दरम्यान त्यांना मिळालेल्या वीरगतीमुळे त्यांचा सन्मान केला जातो. जिल्ह्यात श्रीरंग भागवत, पांडुरंग चव्हाण, साहेबराव बाबर, रामराव पाटील, ग्यानू गायकवाड, श्रीमंत पवार, लक्ष्मण फड, इंद्रजित सानप हे पोलीस अधिकारी, कर्मचारी कर्तव्यावर असताना शहीद झाले होते.

# आक्रमक जमावाला धाडसाने गेले सामोरे; दंगल रोखताना लावली जिवाची बाजी

## पोलीस स्मृती दिन: अंगावर शहारे आणणारा प्रसंग; शहीद साहेबराव बाबर यांचे शौर्य

**बीड/संजय तिपाले:** अंदाधूंद दगडफेक करत सार्वजनिक ठिकाणी अचानक चालून आलेला जमाव... हिंसक बनलेल्या झुंडीला ना चेहरा होता ना परिणामाची चिंता...दिसेल त्या वाहनांना लक्ष्य करुन तोडफोड करत तो निघाला होता. गावातील पोलीस चौकीत जेमतेम पाच पोलीस होते. शस्त्रसामुग्रीचाही अभाव होता, हातात होती फक्त काठी. विथरलेल्या जमावाला शांततेचे आवाहन करत एक पोलीस धीटपणे समोर आला. जमावातील म्होरक्यांशी शांतपणे चर्चा सुरु होती; परंतु जमाव आक्रमक होता. दंगलीचे दुष्परिणाम समजावून सांगत असतानाच एकाने त्यांच्यावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला चढविला. शेवटच्या श्वासापर्यंत खाकीशी इमान राखणारे शहीद सहायक फौजदार साहेबराव राजाराम बाबर यांची ही शौर्यकथा.



शहीद साहेबराव बाबर

अंगावर शहारे आणणारा आणि प्रत्येक पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये नवी चेतना जागविणारा हा प्रसंग आहे पात्रूड (ता. माजलगाव) येथील.सोमवारी (दि.२१) पोलीस स्मृति दिनानिमित्त कर्तव्यावर असताना आपला देह ठेवणाऱ्या पोलीस अधिकारी- कर्मचाऱ्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. जिल्हा पोलीस दलात कर्तव्यावर असताना आतापर्यंत ८ जणांनी प्राण ठेवले. सात जणांना आपत्कालीन स्थितीत तसेच नैसर्गिक संकटामुळे आपले प्राण गमवावे लागले. शहीद साहेबराव बाबर यापैकीच एक.

राम मंदिर आणि बाबरी मस्जिदीवरुन १९९२ मध्ये सर्वत्र दंगली उसळल्या होत्या. संवेदनशील बीड जिल्ह्यातही दंगलीचे लोण पोहोचले. माजलगाव तालुक्यातील पात्रूड येथे ८ डिसेंबर १९९२ रोजी सकाळी ११ वाजता दगडफेक करणाऱ्या जमावाने बस व खासगी वाहनांवर दगडफेक सुरु केली. यात काही जण जखमी झाले. हिंसक बनलेल्या जमावाला पांगविण्यासाठी सहायक फौजदार साहेबराव राजाराम बाबर हे धाडसाने सामोरे गेले. इतर चार सहकारीही जमावाला नियंत्रणात आणण्यासाठी झुंज होते. हिंसा रोखण्यासाठी हिंसक पाऊल नको म्हणून सहायक फौजदार साहेबराव बाबर यांनी बळाचा वापर न करता आधी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. जमावातील काही लोकांना ते दंगलीचे दुष्परिणाम शांतपणे समजावत होते. मात्र, आक्रमक जमाव काही समजून घेण्याच्या स्थितीत नव्हता. यावेळी बाबर यांनी जिवाची पर्वा न करता जमावाशी झुंज दिली; परंतु जमावातील एकाने त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार केला. हा वार वर्मी बसल्याने साहेबराव बाबर हे खाली कोसळले. त्यानंतर त्यांना वाहनातून जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.माजलगाव शहर ठाण्याचे तत्कालीन फौजदार अशोक आम्ले यांच्या फिर्यादीवरुन ८०० जणांवर हत्येचा गुन्हा नोंद झाला. तपासानंतर १३३ जणांविरुध्द दोषारोपपत्र पाठविण्यात आले. मात्र, बिनचेहऱ्यांच्या झुंडीवर आरोप सिध्द न झाल्याने बाबर यांचे मारेकरी शिक्षेपर्यंत पोहोचले नाहीत. साहेबराव बाबर यांना शहीद दर्जा देण्यात आला. ते मूळचे दहीफळ वडमाऊली (ता.केज) येथील. अतिशय हलाखीच्या स्थितीत त्यांनी शिक्षण घेतले. १९ व्या वर्षी १७ जुलै १९६२ रोजी जिल्हा पोलीस दलात रुजू झाले. परळी, पाटोदा, बर्दापूर, अंबाजोगाई, युसूफवडगाव, माजलगाव व रेणापूर (आता लातूर जिल्ह्यात) येथे ३० वर्ष सेवा केल्यानंतर साहेबराव बाबर यांची पात्रूड चौकीत बदली झाली होती.

### शहीद वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी तीन मुले पोलीस दलात

शहीद साहेबराव बाबर यांनी पोलीस दलात निष्ठेने सेवा केली. तीन दशकांच्या सेवेनंतर कर्तव्य बजावताना त्यांना वीरगती प्राप्त झाली. त्यांच्यापश्चात पत्नी आणि चार मुले असा परिवार आहे. साहेबराव बाबर यांच्यानंतर तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांनी या कुटुंबास धीर दिला. त्यांचा मुलगा अनिल यांना अनुकंपावर पोलीस सेवेत घेतले, तर चंद्रकांत हे देखील जिद्दीने पोलीस दलात दाखल झाले. सुनील बाबर हे देखील पोलीस दलात असून अधीक्षक कार्यालयातील लेखाविभागात कार्यरत आहेत. धाकटे पुत्र रविकांत हे नोकरीच्या शोधात आहेत. आपल्या वडिलांनी मोठ्या धैर्याने पोलीस दलात कतव्य पार पाडले. त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आम्ही तीन भावंडे पोलीस दलात आलो आहोत, अशी प्रतिक्रिया सुनील बाबर यांनी दिली.